## प्रकरण ३

# अ) मतंगकालीन राग संकल्पना

बृहद्देशीतील मतंगाच्या वचनानुसार,

"रागमार्गस्य यद्‌रूपं यन्नोक्तं भरतादिभिः
निरूप्यते तदस्माभिः लक्ष्यलक्षणसंयुतं ।।" [१]

राग शब्दाची व्याख्या व स्वरूप बृहद्देशीमध्ये मतंगाने प्रथम सांगितली. ग्रह, अंश, तार, मंद्र, न्यास, अपन्यास वगैरे दहा लक्षणांनी युक्त व रंजक अशा जातिंचे गायन भरतकालात होत असे. विशिष्ट बंधने पाळून त्या गायल्या जात. बांधलेल्या चाली गाण्यासारखे त्यांचे स्वरूप होते. याच जातिगायनाची पुढील पायरी म्हणजे रागगायन होय हे मतंगाच्या मतंगांच्या पुढील श्लोकावरून लक्षात येते.

मतंगानुसार राग म्हणजे,

"योऽयं ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः
रञ्जको जनचित्तानां स रागः कत्थ्यते बुधैः।।" [२]

अर्थात स्वर आणि वर्णाने विभूषित असा ध्वनिविशेष, ज्याद्वारे लोकांचे मनरंजन होते तो राग होय. येथे ध्वनिविशेष याचा अर्थ धुन अथवा चाल अथवा विशिष्ठ स्वरसंगती हा होय. स्वरवर्ण म्हणजे स्वरांची स्थायी, आरोही, अवरोही, संचारी गानक्रिया. थोडक्यात म्हणजे स्वरांच्या विविध क्रियांनी विस्तार करणे म्हणजे वर्ण. ही वर्णक्रिया करण्यासाठी काही लक्षणेही सांगितली आहेत. तेव्हा एखादया स्वररचनेला विविध स्वरांच्या क्रियेने, विशिष्ट लक्षणांनी युक्त अशा तऱ्हेने सुशोभित करणे, ज्यामुळे तो रंजक होईल. असे असल्यास तो राग होय, असे मतंगाच्या वचनावरून स्पष्ट होते

रागाच्या वरील व्याख्येचा संदर्भ घेऊन आपल्याला रागगायन आणि जातिगायनातील भेद अधिक स्पष्ट होऊ शकेल. शारंगदेवकृत संगीत

रत्नाकरात जातिगायनाची काही उदाहरणे दिलेली आहेत. त्यावरून लक्षात येते की जातिगायन हे रागगायनापेक्षा अधिक बंधनयुक्त होते. जातिगायनात दशलक्षणाचे नियम काटेकोरपणे पाळले जात असत. रागगायनात विशिष्ट स्वरसंगती आणि विशिष्ट कणयुक्त स्वरांचा वापर पूर्वनियोजित असतो. जातिगायन विशिष्ट स्वरसंगतीला अनुसरून करावयाचे नसल्याने त्यात आपल्याला अनेक रागांच्या छाया दिसू शकतात. मात्र रागगायनात दुसऱ्या रागांची छाया दिसणे हे त्या विशिष्ट रागस्वरूपाला हानिकारक ठरेल. रागात आविर्भाव तिरोभावाच्या स्वरूपात काही प्रमाणात दुसऱ्या रागाची छाया दाखविणे हे मात्र त्या रागरूपाला सौंदर्यवर्धक ठरते. एकाच जातितून अनेक राग निर्माण होऊ शकत असल्याने जातिंची संख्या जरी मर्यादित असली, तरी रागांची संख्या मात्र अमर्याद आहे.

आणखी एका सूत्रवचनाच्या आधारे राग ही संकल्पना स्पष्ट करता येईल आणि जातिगायनाशी तिचा संबंध दाखविता येईल. मुळात स्वर म्हणजे स्वतःचं रंजन करणारा. अशा स्वरांची रचना जी रंजक आहे, तिला जाति म्हणतात. 'रंजकः स्वरसंदर्भः गीतमित्यभियते।' म्हणजे असा स्वरसंदर्भ किंवा ध्वनिविशेष जेव्हा स्वरवर्णाने विभूषित केला जातो, तेव्हा राग निर्माण होतो. म्हणजेच,

१) स्वर

२) स्वर+रंजकता = जाति

३) स्वर+रंजकता+स्वरवर्णविभूषित = राग

४) जाति+स्वरवर्णविभूषित = राग

अशाप्रकारे स्वर, जाति आणि राग यांचा विकासक्रम आढळतो.

रागांचे बीजरूप असलेल्या जातिंचा उल्लेख भरताच्या नाटयशास्त्रात आढळतो. त्यानंतर नारद, याष्टिक यांच्या काळात ग्रामराग विकसित झाले आणि सुमारे सातव्या शतकात राग संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट केले गेले.

भरताच्या नंतरच्या ग्रंथकारांपैकी त्याचा पुत्र दत्तिल (सहावे शतक) याने मागधी, अर्धमागधी, संभाविता व पृथुला अशा चार प्रकारच्या गीती मानल्या आहेत, पण त्यांची विस्तृत माहिती दिलेली नाही. दत्तिलनंतर मतंगमुनीने बृहद्देशी ग्रंथात ग्रामराग शब्द वापरला आहे. यावरून भरतकालीन जातिगायनाची परिणीती तोपर्यन्त रागगायनात झाली असावी हे स्पष्ट होते.

भरतकाळात अस्तित्त्वांत असलेल्या दोन ग्रामांतून मूर्च्छनांची उत्पत्ती झाली, मूर्च्छनांतून जाति, व जातिंतून ग्रामराग निर्माण झाले. अठरा जातिंतून एकूण तीस ग्रामरागांची निर्मिती सांगितली आहे. ग्रामरागांचे त्यांच्या प्रकृतीनुसार एकूण पाच प्रकार सांगितले आहेत. प्रकार म्हणजेच ग्रामराग गायनाच्या विविध शैली. त्यांना गीती असे म्हटले गेले. प्रत्येक गीतीची स्वतःची अशी काही वैशिष्टये होती.

"पञ्चधा ग्रामरागास्युः पञ्चगीती समाश्रयात्।" [३]

म्हणजेच पाच प्रकारचे ग्रामराग आहेत, जे पाच प्रकारच्या गीतींवर आधारित आहेत. त्या पाच गीती पुढीलप्रकारे –

१) शुध्दा गीती – वक्रतारहित मधुर असा स्वरप्रयोग

२) भिन्ना गीती – वक्र, मधुर, गमकयुक्त स्वरप्रयोग

३) गौड गीती –तीनही सप्तकांत हनुवटी छातीवर ठेऊन गमकयुक्त स्वरांचा प्रयोग

४) वेसर गीती – वेगयुक्त असा स्वरप्रयोग

५) साधारण गीती – वरील चारही गीतींचा मिश्र प्रयोग

गीतींच्या एकूण संख्येमध्येही विद्वानांमध्ये मतांतर आढळते. मतंगाने बृहद्देशीमध्ये वरील पाच गीतींसह भाषा आणि विभाषा या आणखी दोन, म्हणजेच एकूण सात गीती सांगितल्या आहेत. संगीत रत्नाकरात पाच, याष्टिकने भाषा, विभाषा व आंतरभाषा अशा तीन, तर शार्दूलने फक्त एकच भाषा गीती सांगितली आहे.

तीस ग्रामरागांचे गीतींनुसार विभाजन पुढीलप्रमाणे केले गेले.

| क. | गीती | रागसंख्या | षड्ज ग्राम | मध्यम ग्राम |
|---|---|---|---|---|
| १) | शुध्दा | सात | ३ | ४ |
| २) | भिन्ना | पाच | २ | ३ |
| ३) | गौड | तीन | २ | १ |
| ४) | वेसरा | आठ | ४ | ४ |
| ५) | साधारण | सात | ३ | ४ |

कश्यप आणि मतंगाने प्रत्येक गीतीवर आधारित रागाचे वर्णन करण्यापूर्वी तिचे लक्षण सांगितले आहे. मतंगाने वेसरा गीतीलाच रागगीती म्हटले आहे. शारंगदेवाच्या वेसरा गीतीच्या वर्णनावरून वेसरा गीती हीच रागगीती आहे याचे प्रमाण आपल्याला मिळते.

वेगवद्भिः स्वरैर्वर्णचतुष्केप्यति रक्तितः

वेगस्वरा रागगीतिर्वेसरा चौच्यते बुध्दैः।। [४]

म्हणजे, चार वर्णांनी युक्त, अतिशय रक्तीगुण असलेल्या, वेगवान स्वरयुक्त रागगीतीलाच बुध्दिवंतांनी 'वेसरा गीती' म्हटले आहे.

मतंगाने रागगीतीचे वर्णन करण्यापूर्वी याबाबत कश्यप आणि दुर्गाशक्ती मतही सांगितले आहे. या गीतीअंतर्गत मतंगाने आठ रागांचा उल्लेख केलेला असून त्यानंतरच्या संगीतकारांनी याच आठ रागांना वेसरा गीतीमध्ये सांगितले आहे. यावरूनही हे सिध्द होते, की रागगीती हीच वेसरा गीती होय.

गीतींचेही दोन प्रकार आहेत. १) स्वराश्रिता २) पदाश्रिता. पदाश्रिता गीतीचे मागधी, अर्धमागधी, संभाविता व पृथुला असे चार प्रकार आहेत. स्वराश्रिता गीतीच्या संख्येसंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. मतंगाने त्यांची संख्या सात सांगितली आहे, तर शारंगदेवाने पाच सांगितली आहे. या गीतींची लक्षणे बृहद्देशी आणि संगीत रत्नाकरात आहेत.

गीतींप्रमाणेच आधुनिक प्रचलित रागांना देखील आपण त्यांच्या प्रकृतीनुसार विविध गायनशैलींमध्ये विभाजित करू शकतो.

१) गंभीर राग –आलाप प्रधानता –दरबारी, पूरिया इ.

२) वेगयुक्त – अडाणा इ.

३) गमकयुक्त – मेघमल्हार, नायकी

४) चंचल प्रवृत्तीचे राग – उपशास्त्रीय संगीताचे राग – पिलू, काफी, मांड इ

एखादया रागाचा समावेश ज्या गीतीमध्ये केलेला असेल, त्या रागाला त्या गीतीच्या लक्षणांप्रमाणे व चलनाप्रमाणे गायले जात असे.

भाषा, विभाषा, आंतरभाषांची उत्पत्ती ही रागांतूनच झाल्याची सांगितली असल्याने जो भाषाराग ज्या ग्रामरागांतून उत्पन्न होतो, त्यामध्ये त्या गीतीची किंवा रागाची लक्षणे दिसत. नान्यदेवाने भरतभाष्यम् मध्ये हा उल्लेख केला आहे.

"यस्य यस्येति रागस्य या या भाषा विभाषिका
तस्य तस्यैव या गीतीः सा तासामपि कथिता।" [५]

याष्टिकने भाषाजनक राग १५, मतंगाने ६, कश्यपने १२ आणि शार्दूलने ४ सांगितले आहेत. मतंगाने भाषेचे पुढील चार प्रकार सांगितले आहेत.

१) मूला – इतर कुठल्याही भाषेचा प्रभाव नसणारी

२) स्वराख्या – कोणत्याही स्वराच्या नावावरून असलेली

३) देशाख्या – जी एखादया देशाच्या नावावरून आहे

४) अन्योपरागता – वरील तिन्हींचे मिश्रण

याष्टिकने याच चार भाषांना अनुक्रमे मुख्या, स्वराख्या, देशजा आणि संकीर्णा ही नावे दिली.

मतंगाने भाषा विभाषांना ग्रामरागांतर्गत ठेवले, मात्र इच्छेनुसार स्वरप्रयोग करण्याची सूटही दिली. जाति किंवा ग्रामरागांमध्ये ही सूट नव्हती

जातिंना आणि ग्रामरागांना गांधर्वांतर्गत ठेवले गेले तर रागांग, भाषांग आदी देशी प्रकारांना गानांतर्गत ठेवले गेले. कारण भाषेपासून मूळ

स्वरूपात वैचित्र्य दिसत असे. नियमांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याने भाषादी प्रकारांचा समावेश गांधर्वमध्ये केला गेला नाही.

गांधर्वात म्हणजेच, जाति किंवा ग्रामरागांच्या प्रयोगात मध्यम स्वराला अविलोपी मानले गेले परंतु वैचित्र्यासाठी भाषा आणि देशी रागांमध्ये आवश्यक तेथे माध्यमाचा लोप केला गेला. मानवाच्या सृजनशील स्वभावामुळे संगीतातही विविध प्रयोग होऊन त्याचा प्रसार झाला. ग्रामरागांशी संबंधित असल्याने भरतानंतर याष्टिक, शार्दूल आणि मतंगादी विद्वानांनी भाषादींचे वर्गीकरण मार्गच्या आधारावर केले. या काळापर्यंत देशी रागांमध्येही बरेच परिवर्तन होत गेले आणि त्यांचे स्वरूप संपूर्णपणे बदलले. बृहद्देशीमध्ये जातिराग, भाषा आदींचे विवेचन करण्यासाठी द्वादश मूर्च्छनांचा उल्लेख आढळतो. मात्र विवेचन करताना फक्त जातिंसाठीच या मूर्च्छना सांगितल्या आहेत. ग्रामरागांसाठी सप्तस्वर मूर्च्छनेचा उल्लेख आहे. ग्रामरागांच्या विविध भाषांची उत्पत्ती ग्रामरागांतूनच असल्याने त्यांच्या वेगवेगळया मूर्च्छना सांगितल्या नाहीत. केवळ ग्रह, अंश आणि न्यास स्वरांवरूनच भाषा ओळखली जाई. शारंगदेवाने भाषांचे वर्णन रागांग व भाषांगासोबत केले आहे अधुना प्रसिध्द रागांचे विवेचन करताना ग्रामराग, त्यातून निर्माण झालेल्या भाषा, विभाषा आणि भाषांगांचा (देशी राग) उल्लेख केला आहे.

भाषागीती – भाषागीती म्हणजे रागांचे प्रकार किंवा गायनशैली. या गायनशैलीत ज्या रागांचे गायन केले जात असे, त्यांना भाषाराग असे म्हणत. एकूण ९६ भाषाराग होते.

विभाषा गीती – ही देखील एक गायनशैली असून या अंतर्गत वीस राग गायले जात.

आन्तरभाषा गीती – या प्रकारच्या गायनशैलीत फक्त चार रागांचा उल्लेख आढळतो.

याष्टिकने भाषा, विभाषांची उत्पत्ती ग्रामरागांपासून सांगितली आहे.

"ग्रामरागोद्‌भवा भाषा भाषाभ्यश्च विभाषिकाः

विभाषाभ्यश्च स जातास्तथा चान्तरभाषिका।"

जातिंपासून उपरागांची निर्मिती झाली. ग्रामरागांच्या जवळ असल्याने त्यांना उपराग म्हटले गेले, तर जाति आणि ग्रामांशी संबंधित असल्याने ग्रामरागांना राग म्हटले गेले.

जातिभ्यो जातानामपि ग्रामराग समीपन्वादष्टानामुपरागत्वम्। [६]

उपरागांनंतर जातिंमधूनच राग उत्पन्न झाले.

"उपरागेभ्योऽनन्तरं जातिभ्य एव जाताः श्री रागादयो विंशति निरूपपदराग व्यपदेश भाषः।" [७]

भाषा हे रागांचे आलापप्रकार होते.

तथा चाह मतंग – ग्राम रागाणामेवालाप प्रकारः भाषावाच्याः। भाषा शब्द अत्र प्रकारवाची ।

यासाठी कल्लीनाथाने मतंगाचे वरील वचन आधार म्हणून प्रस्तुत केले. येथे भाषा हा शब्द प्रकार या अर्थी वापरला आहे. याचप्रकारे विभाषा आणि आंतरभाषांचे स्पष्टीकरणही मतंगमतानुसार कल्लिनाथाने दिले आहे.

"एवं विभाषांतरभाषाशब्दावपि तत्तदनन्तवोत्पन्नालाप प्रकारवाचकावित्यवगन्तव्यम्। तासामपि रञ्जनाद्रागत्वं च बोध्दव्यम्।।" [८]

अशाचप्रकारे विभाषा आणि आन्तरभाषा शब्दही उत्पन्न झालेल्या आलापप्रकारांसाठीच वापरले गेले आहेत. रंजक असल्याने या सर्वांना राग समजले पाहिजे.

महाराणा कुम्भाने भाषा, विभाषा आदींचे वर्णन मतंगाप्रमाणेच केले आहे. मात्र बहुतेक ठिकाणी त्यांनी आलाप आणि रूपकालाप पण दिले आहेत. मतंगानेही याबाबत काही उदाहरणे दिलेली आढळतात. यावरून त्यावेळी देखील आलापांचा प्रयोग होत असे हे सिध्द होते.

रागगायनाचा प्रचार झाल्यानंतर त्यात प्रयुक्त होणा-या स्वर, ग्रह, अंश, न्यास, मूर्च्छना, वर्ण, अलंकार, ताल आदींचा प्रयोग मतंगद्वारा वर्णित रागरूपांमध्ये अढळतो. उदाहरणादाखल मतंगाने केलेले कैशिक रागाचे वर्णन पाहू.

षड्जांशो पंचमो न्यासः कैशिकी जाति सम्भवः

तथा कर्मारवी जातेः स्वरैः पूर्णश्च कैशिकः।। [१]

अस्यार्थ – शुध्द कैशिको नाम मध्यमग्रामसंम्बन्ध। कैशिकी कर्मारवी जात्योः समुत्पन्नत्त्वातः। तार षड्जोऽस्य ग्रहः अंश पंचमो न्यासः निषादोऽत्र काकली। पूर्ण स्वरश्चायम्। चित्रस्या टादशाऽगस्य निर्वहणे विनियोगः। वीररौद्रादिकौ रसः। कलावृत्तौ कला–चित्रे कला। स्वरपदगीते चचत्पुटादितालः।

अर्थात, मध्यमग्रामाशी संबंध असलेला शुध्दकैशिक हा राग कैशिकी आणि कर्मारवी जातिंतून उत्पन्न झाला आहे. तार षड्ज याचा ग्रह आणि अंश स्वर आहे. पंचम न्यास आणि निषाद काकली आहे. वीर, रौद्र रस, षड्जादी मूर्च्छना, आरोही वर्ण, आणि प्रसन्नादि अलंकार आहे. चच्चत्पुट ताल आहे.

अशाप्रकारे मतंगकालीन राग संकल्पना आणि आधुनिक राग यांच्या तुलनात्मक अभ्यासाअंती दोहोंमध्ये बरेच साम्य आढळून येते. मतंगकालीन गीती आणि त्यांच्यानुसार विविध जातिंचे होणारे गायन हे आधुनिक युगातील रागांचे त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार विशिष्ट अंगांना प्राधान्य देऊन केलेल्या गायनाप्रमाणेच होते हे सिध्द होते. त्याचबरोबर मतंगाने रागरूपात प्रयुक्त होणाऱ्या स्वर, ग्रह, अंश, न्यास, मूर्च्छना, वर्ण, अलंकार, ताल आदींचे केलेले वर्णन हे आधुनिक युगातील रागवर्णनाप्रमाणेच आहे. वरील सर्व लक्षणांना अनुसरूनच त्या काळी रागगायन होत असे. आधुनिक काळातही याच सर्व लक्षणांचा प्रयोग रागगायनात केला जातो.

## आ) ग्रामराग आणि त्यांची लक्षणे

शारंगदेवाच्या संगीत रत्नाकरात ग्रामरागांचे विस्तृत वर्णन केलेले आढळते. नाटयशास्त्रात ग्रामरागांचा केवळ उल्लेख आढळतो. मात्र कल्लिनाथाने आपल्या नाटयशास्त्रावरील टीकेत ग्रामराग ज्या पाच गीतींच्या आधारे गायले जात, त्यांची नावे दिलेली आहेत. बृहद्देशीमध्ये ग्रामरागांचे भाषा, विभाषा, आंतरभाषा आणि त्यांच्या उपप्रकारांमध्ये विभाजन केलेले आढळते,

परंतु त्याची उदाहरणे दिलेली नाहीत. संगीत रत्नांकरात मात्र ग्रामराग, त्यांच्या भाषा, विभाषा, आंतरभाषा,उपग्रामराग आदी अनेक रागांचे त्यांच्या उदाहरणासहीत सविस्तर वर्णन केलेले आढळते. या सर्व ग्रंथांच्या अभ्यासाद्वारे भरतपूर्व कालापासून संगीताच्या विकासाचे स्पष्ट चित्र आपल्यासमोर येते.

नारदीय शिक्षेतही ग्रामरागांचा उल्लेख आढळतो. त्यानंतर आठव्या शतकात मतंगाच्या बृहद्देशीमध्ये ग्रामराग आणि त्यांच्या प्रकारांचे जे वर्णन आढळते, त्यावरून असे दिसून येते की त्या काळात जातिगायन हळूहळू लुप्त प्रावत होते, आणि ग्रामरागांचा विकास होत होता. मतंगकालीन संगीतावर मात्र निश्चितच जातिगानाचाच प्रभाव होता. प्रत्यक्षात तत्कालीन संगीत पध्दती दोन भागात विभागली गेली होती , गांधर्व आणि गान.

गांधर्व च्या अंतर्गत ग्राम, मूर्च्छना आणि जातिंचा समावेश केला जाई, तर ग्रामराग गानांतर्गत येत. 'गान'ला लौकिक संगीत असे देखील म्हटले जाई. भरतानंतर काही शतकांत ग्राम, मूर्च्छना आणि जाति पध्दती पूर्णपणे लोप पावली आणि तिची जागा ग्रामराग पध्दतीने घेतली आणि तिचा विकास होऊ लागला त्यानंतर अस्तित्त्वात आलेल्या रागरागिणी पध्दतीचा उगमही ग्रामराग पध्दतीतूनच झाला. ही पध्दतीही पुढे काही शतकेपर्यंत प्रचारात होती. आणि त्यांतूनच पुढे रागगायन पध्दतीचा उगम झाला. अजूनही कर्नाटकी आणि हिंदुस्थानी संगीतातील अनेक रागनावांचे ग्रामराग आणि विविध भाषारागांशी साम्य आढळते. उदा. कर्नाटकी संगीतातील रेवगुप्त, नागगांधार इ., तर हिंदुस्थानी संगीतातील भिन्नषड्ज, कुकुभ, नटनारायण, देशाख्य (देवसाख), कामोद, भैरव, मेघ इ.

बृहद्देशीपासून संगीत रत्नाकराच्या काळापर्यंत ग्रामरागांमध्ये सतत लाक्षणिक बदल होत गेले. मतंगकालीन ग्रामरागांचे वर्गीकरण तीन विभागात होत असे. मुख्य सात रागांपैकी काही राग हे एका किंवा त्यापेक्षा अधिक गीतींमध्ये गायले जात, तर काही राग सर्व गीतींत गायले जात. मध्यम आणि,षड्ज ग्रामांतील सातही ग्रामराग हे एकाच गीतींत गायले जात.

अ) शुध्दा गीतीमध्ये षड्ज आणि मध्यम ग्रामांतील पुढील रागांचा समावेश होता.

| **षड्ज ग्राम** | **मध्यम ग्राम** |
|---|---|
| १) शुध्द षड्ज ग्रामराग | १) शुध्द पंचम |
| २) शुध्द कैशिक मध्यम | २) शुध्द मध्यम ग्राम राग |
| ३) शुध्द साधारित | ३) शुध्द कैशिक |
| | ४) शुध्द षाडव |

आ) भिन्ना गीतीअंतर्गत येणारे राग –

१) कैशिक मध्यम
२) भिन्न षड्ज
३) भिन्न तान
४) भिन्न कैशिक
५) भिन्न पंचम

इ) गौडी गीतीअंतर्गत येणारे राग –

१) गौड कैशिक मध्यम
२) गौड पंचम
३) गौड कैशिक

ई) वेसरा गीतीअंतर्गत येणारे राग –

| **षड्ज ग्राम** | **मध्यम ग्राम** |
|---|---|
| १) टक्क | १) बोट्टा् |
| २) वेसरा | २) मालवकैशिक |
| ३) सौवीरा | ३) मालवपंचम |
| | ४) टक्क कैशिक |
| | ५)हिंडोल |

शेवटचे दोन राग दोन्ही रागात गायले जातात.

उ) साधारणी गीतीअंतर्गत येणारे राग –

१) रूपसाधारा
२) शक
३) भम्माण पंचम
४) नर्त

५) गांधार पंचम                    ६) षड्ज कैशिक

७) कुकुभ  हा राग दोन्हीही ग्रामांत गायला जातो.

अशाप्रकारे पाच गीतींअंतर्गत एकूण तीस राग येत .या तीस रागांशिवाय काही उपराग देखील सांगितले आहेत .ग्रामरागांच्या जवळ असल्याने त्यांना उपराग संबोधिले गेले. असे एकूण आठ उपराग होते.

१) शकतिलक  २) टक्कसैंधव  ३) कोकिळापंचम  ४) रेवगुप्त

५) पंचम षाडव  ६) भावना पंचम  ७) नाग गांधार  ८) नागपंचम

रागांची एकूण संख्या वीस सांगितली आहे. कल्लिनाथाच्या मतानुसार जातिंशी साम्य असल्याने त्यांना राग म्हटले गेले.

१)श्रीराग  २)नट  ३) ४) बंगाला (दोन प्रकार)  ५)भाषा

६)मध्यम षाडव  ७)रक्तहंसा  ८)कोल्लाहसक  ९) प्रसव १०)भैरव

११)मेघ  १२)सोम  ३)कामोद  १४)कामोद (दोन प्रकार) १५)आमर पंचम

१६)कंदर्प  १७)देशाख्य  १८)देशाख्य (दोन प्रकार)  १९)कैशिक कुकुभ

२०)नटनारायण

शारंगदेवाने सात प्रमुख ग्रामरागांशिवाय आणखी पंधरा ग्रामराग सांगितले आहेत.

१) सौवीर  २) कुक्कुभ  ३) टक्क  ४)पंचम  ५) भिन्न पंचम  ६) टक्क कैशिक  ७) हिंडोल  ८) बोटट्

पंधरापैकी पुढील सात रागांमधून भाषारागांची उत्पत्ती झाली.

९) मालव कैशिक  १०) गांधार पंचम  ११) भिन्न षड्ज

१२) वेसरा–षाडव  १३) मालव पंचम  १४) तान  १५)पंचम षाडव

ग्रामरागांपासून उत्पन्न झालेल्या भाषांची  संख्या पुढीलप्रमाणे –

१) सौवीर – चार

२) कुकुभ – चार

३) टक्क  –एकवीस भाषा, चार विभाषा

४) पंचम – दहा भाषा , दोन विभाषा

५) भिन्न पंचम – चार

६) टक्क कैशिक– दोन भाषा, एक विभाषा

७) बोट्ट – एक

८) मालवकैशिक – तेरा भाषा, दोन विभाषा

९) गांधार पंचमी – एक

१०)भिन्न षड्ज – सतरा भाषा, चार विभाषा

११)वेसरा षड्ज – दोन भाषा, दोन विभाषा

१२)मालव पंचम – तीन

१३)तान – एक

१४)पंचम षाडव – एक

१५)रेवगुप्त – एक भाषा, एक विभाषा

अशाप्रकारे ९६ भाषा, २० विभाषा आणि ४आंतरभाषा शारंगदेवाने सांगितल्या आहेत.

## प्रमुख सात ग्रामरागांची लक्षणे

### १) मध्यम ग्राम राग

हा राग गांधारी, मध्यमा आणि पंचमी जातिंच्या मिश्रणाने तयार झाला आहे. यात काकली निषादाचा प्रयोग करतात. याचा ग्रह स्वर मंद्र षड्ज आणि न्यास स्वर मध्यम आहे. मूर्च्छना सौवीरी आहे. संचारी वर्णात प्रसन्नादि अलंकारात याची शोभा वाढते. करुण रसाचा हा राग असून ग्रीष्म ऋतूत प्रथम प्रहरांत गातात.

### २) षडज् ग्राम राग

**कश्यप** – षाडजी आणि मध्यमा जातिंतून उत्पन्न षड्जग्रामाचा हा संपूर्ण राग आहे. याचा अंश स्वर षड्ज आणि न्यास स्वर मध्यम आहे.

**नान्यदेव** – हा षड्जग्रामोत्पन्न राग असून याचा ग्रह आणि अंश स्वर षड्ज आहे. न्यास स्वरांत विदारी स्वर सा आणि रे आहेत. बाकी स्वर अनुवादी आहेत. मूर्च्छना उत्तरामंद्रा असून यात गांधाराचे बहुत्त्व आहे. षाडजी आणि षड्जमध्यमा जातिंतून उत्पन्न झालेला हा राग संपूर्ण आहे. यांत कंपित धैवताचा प्रयोग होतो. शृंगार, अद्भूत, रौद्र व वीररसप्रधान राग आहे. नान्यदेवाने यात रूपकम् सांगितले आहे.

**शारंगदेव** – हा षड्ज मध्यमा जात्योत्पन्न संपूर्ण राग आहे. याचा समावेश शुध्दा गीतींत होतो. याचा ग्रह आणि अंश स्वरतारषड्ज आहे. न्यास स्वर मध्यम असून यात अवरोही आणि प्रसन्नान्त अलंकारांचा उपयोग होतो. षड्जादि मूर्च्छना असून काकली नी आणि अंतरगांधाराचा प्रयोग होतो. याची देवता बृहस्पती आहे अद्भूत, रौद्र, वीर रस असून वर्षा ऋतूत दिवसाच्या प्रथम प्रहरी गातात. शारंगदेवाने यानंतर आलाप, करण, पद, आणि आक्षिप्तिका सांगितली आहे.

## ३) शुध्द साधारित ग्राम राग

**नारदिय शिक्षा** –

अंतरस्वरयुक्ता काकलीर्यत्रदृष्यते
तंतु साधारितं विद्यात् पंचमस्थ तु कैशिकं ।।[१०]

**अभिनवगुप्ता**नुसार साधारित ग्रामरागासंबंधी कश्यपाचे मत –

सांशो मान्तो तयोश्चैको धैवती धैवती षड्जमध्यमोः
कार्यकैशिक मध्योऽन्यो जातः साधारितः स्मृतः।।[११]

**मतंग** – हा षड्ज ग्रामाशी संबंधित राग असून षड्जमध्यमा जातिंतून उत्पन्न होतो. याचा ग्रह आणि अंश स्वरतारषड्ज आहे. न्यास स्वर मध्यम, निषाद गांधार अल्प, संपूर्ण राग, रस वीर, रौद्र, षड्जादि मूर्च्छना, अवरोही वर्ण, प्रसन्नान्त अलंकार, यांतील स्वर , पद आणि गीत चच्चत्पुटादि तालात गेय आहेत. **नान्यदेवा**ने आलाप आणि रूपक पण सांगितले आहेत.

**शारंगदेवा**ने देखील वरील वर्णनाशिवाय याची देवता सूर्य सांगून समय दिवसाचा प्रथम प्रहर सांगितला आहे.

## ४) पंचम ग्राम राग

या रागाच्या नावाचा उल्लेख जरी सर्व ग्रंथकारांनी केलेला असला तरी याचे संपूर्ण वर्णन मात्र शारंगदेवानेच केलेले आहे.

हा राग मध्यमा आणि पंचमी जातिंच्या संयोगाने तयार झाला असून यात काकली निषाद आणि अंतरगांधाराचा प्रयोग होतो. याचा ग्रह आणि अंश आणि न्यास मध्यसप्तकातील पंचम आहे. मूर्च्छना हृष्यका, देवता कामदेव संचारी वर्ण समय ग्रीष्म ऋतूत दिवसाचा प्रथम प्रहर.

### ५) कैशिक ग्राम राग

**नारदिय दिक्षा** – काकर्लीदृष्यते यत्र प्राधान्यं पंचतस्य तु

कश्यपः कैशिकं प्राह मध्यमग्रामसंभवम्।।[१२]

मध्यम ग्रामोत्पन्न राग, पंचमाचे प्राधान्य , काकली निषादाचा प्रयोग.

**अभिनवगुप्त** – कश्यपाच्या मतानुसार

विगानि कैशिकः पूर्णः सांशः पान्तश्च कैशिकी कर्माख्यस्य हेतुः सा ।।

हा कैशिकी आणि कर्मारवी जातिंतून उत्पन्न झाला आहे. याचा ग्रह आणि अंश स्वरतारषड्ज असून न्यास स्वर पंचम आहे. हा पूर्ण राग आहे. यात काकली निषादाचा प्रयोग होतो. आरोही वर्ण प्रसन्नादि अलंकार आणि स्वर, पद, गीतात चंचत्पुट तालाचा प्रयोग करतात. वीर आणि रौद्र रसप्रधान राग असून षड्जादि मूर्च्छना आहे.

शारंगदेवाने वरील वर्णनाशिवाय वीर, रौद्र आणि अद्भूत रस सांगून अवरोही वर्ण सांगितला आहे. तसेच याचा समय दिवसाचा प्रथम प्रहर आहे. मात्र दोघांच्याही वर्ण आणि अलंकारांत फरक आहे.

## ६) षाडव ग्राम राग

**कश्यप** – मध्यमा जातितून उत्पन्न रागात अंश आणि न्यास स्वर मध्यम आहे.

**मतंग** – सहा रागांमध्ये मुख्य असल्याकारणाने याला षाडव म्हटले गेले. मध्यमा जातिंमध्ये विकार उत्पन्न होऊन हा शुध्द राग निर्माण झाला. यात गांधार दुर्बल असून याचा न्यास स्वर मध्यम आहे.

ग्रह स्वर तार मध्यम, निषाद , गांधार काकली आणि अंतर, संपूर्ण राग, वादी–संवादी म–सा, रे, प अनुवादी, शृंगार आणि हास्य रस, मध्यमादी मूर्च्छना, अवरोही वर्ण, प्रसन्नान्त अलंकार, चच्चत्पुट ताल.

**शारंगदेवा**नुसार – वरील सर्व वर्णनाबरोबरच यात ग,प दुर्बल आहेत. समय पूर्व प्रहर.

## ७) कैशिक मध्यम ग्राम राग

**नारद** – कैशिकं भवायित्त्वातु स्वरैः सवैः समन्वितः

यस्मात्तु मध्यमे न्यासस्तमात्कैशिक मध्यमः।।[१३]

म्हणजेच पूर्वोक्त कैशिक रागात जेव्हा सर्व स्वरांचा प्रयोग होतो आणि त्यात मध्यमावर न्यास केला जातो, तेंव्हा त्यास कैशिक मध्यम ग्रामराग असे म्हणतात.

**अभिनवगुप्ता**च्या मते कश्यपाने यास धैवती आणि षड्जमध्यमा जातिंतून उत्पन्न झाल्याचेमानले आहे. याचा अंश व अंत सा व म आहे.

**मतंग** – अंश षड्ज, न्यास मध्यम, षड्जमध्यमा ग्राम संबंधित राग, कैशिकी आणि षड्जमध्यमा जातिंतून उत्पन्न , षड्ज आणि मध्यम दोन्ही ग्रामोत्पन्न, ग्रह आणि अंश तार षड्ज, निषाद , गांधाराचे अल्पत्त्व, पंचम आणि ऋषभाचा लोप, षड्जादी मूर्च्छना, प्रसन्नान्त अलंकार, रस वीर, रौद्र.

**शारंगदेवा**नुसार – यात रे, प वर्जित आहेत, अवरोही वर्ण, आदयमूर्च्छना युक्त, वीर, रौद्र, अद्भूत रस, दिवसाच्या पूर्व प्रहरात गायन होते.

शारंगदेवाने आलाप, करण आणि आक्षिप्तिकेत मंद्र, मध्य, आणि तारसप्तकदर्शक चिन्हे दिलेली आहेत.

प्राचीन काळात विविध कालखंडांत अस्तितत्त्वात असलेल्या शुध्द स्वरसप्तकांबाबत मतभेद आढळतात. मात्र प्राचीन सप्तक भैरवीचे मानल्यास रत्नाकरातील अनेक रागांचे प्रचलित रागांशी साम्य आढळते. जसे–

रत्नाकरांतील शुध्दसाधारित (आसावरी, गुणकी सारखा), षड्जग्राम(जोगिया), भिन्नकैशिकमध्यम, शुध्दकैशिकमध्यम (चंद्रकंस), धन्नासि (सिंधभैरवी), भिन्नपंचम–वराटी (तोड़ी), भाषडव (ललत), डोम्बकृति (भूपाली), सावरी (आसावरी), रामकृति हे राग प्रत्यक्ष प्रचारात आढळतात, तर भिन्न षड्ज–भैरव, हिंडोल–वसंत, मल्हारी–मल्हार, वेलावली, श्रीराग, मेघ, कामोद, ललिता, मालवा इ. राग थोडयाफार फरकाने आढळतात. अशाप्रकारे रत्नाकरकालीन राग आणि प्रचलित रागांत साम्य आढळून येते.

प्राचीन राग भाषडव– आधुनिक राग ललित/तोड़ी

विकारिमध्यमोद्भूतः भाषडवो गपदुर्बलः
न्यासांशमध्यमस्तारमध्यग्रहसंयुतः
काकल्यन्तरयुक्तश्च मध्यमादिकमूर्च्छनः
अवरोह्यादिवर्णेन प्रसन्नान्तेन भूषितः
पूर्वरंगे प्रयोक्तव्यो हास्यशृङ्गारदीपकः
शुक्रप्रियः पूर्वयामे तोडिका स्यात्तदुद्भवा।।

रत्नाकरातील भाषडव हा राग मध्यमप्रधान आहे आणि त्रिश्रुतिक पंचमयुक्त घेणारा म्हणजेच तीव्र मध्यम घेणारा आहे. मध्यमा जातिच्या विकृतीतून म्हणजेच ग्रह आणि न्यास वेगळे असणाऱ्या मध्यमा जातितून याची उत्पत्ती सांगितली आहे. ग्रह, तार मे असून अवरोही चलनाचा राग आहे. यात ग, प दुर्बल, प त्रिश्रुतिक सांगितला आहे. मूळ सप्तक भैरवीचे धरून हे स्वरूप मं रें सां नि ध (मे) म ग रे सा, नि रे (ग) म मे म ग आजच्या ललितसारखे आहे. फरक गांधारात आहे. ललितात गांधार स्पष्ट आणि प्रबळ आहे, तर भाषडवात तो वर्ज्य किंवा अल्प घ्यावा लागेल. शुक्रप्रिय आणि पूर्वयामे म्हणजे पहिल्या

प्रहराचा राग आहे. ललितही प्रातःकालीन आहे. याच षाडवातून तोड़ी सांगितली आहे.

मध्यमांश ग्रहन्यासा स तारा कम्प्रपञ्चमा ।

समेतरस्वरा मन्द्रगान्धारा ह किरिणी ।।

येथे पंचमावर कंपन (आंदोलन), ग्रह आणि अंश मध्यम हे तोड़ीचे लक्षण सांगितले आहे. कल्लिनाथ टीकेमध्ये अधुना प्रसिध्द देशी रागांतर्गत मध्यमग्रामापासून उत्पन्न होणाऱ्या रागांचा आरंभ मध्यमाऐवजी षड्जापासून केलेला आहे. सहाजिकच मध्यमाचा सा केल्यावर पंचमाचा ऋषभ झाला आणि पंचमाऐवजी ऋषभ आंदोलित होऊ लागला. म्हणजेच ललितच्या मध्यमाचा षड्ज केला की आजची तोड़ी मिळते. अशाप्रकारे या रागांच्या आधुनिक काळांतील नवनिर्मित प्रकारांचा संबंधही आपण प्राचीन ग्रामरागांशी जोडू शकतो.

शारंगदेवाने उल्लेखिलेल्या रागनामांमध्ये काही राग क्षेत्रवाचक आढळतात, जसे मालव, गौड, कर्णाट, द्रविड, सौराष्ट्र, दक्षिण, गुर्जर इ. शारंगदेवाच्या काळात खालील रागांच्या स्वरूपातही परिवर्तन झालेले आढळते.

१) रागांग राग – बंगाल भैरव, वराटी, गुजरी, बसंत, धन्नासि, देशी, देशाख्या

२) भाषांग राग – डोम्बकी, प्रथम मंजिरी, कामोदा

३) कियांग राग – गौडकृती, देवकृती

४) उपांग राग – भैरवी, मल्हार, कर्णाट गौड, तुरुष्क गौड, द्रविड गौड, ललिता

संगीत रत्नाकराच्या कल्लिनाथ टीकेवरून आणखी काही गोष्टी लक्षात येतात, त्या म्हणजे रत्नाकरकालापासून प्रत्येक रागाची सुरूवात षड्जापासून होऊ लागली, याचाच अर्थ मूर्च्छना पध्दतीचे तितकेसे महत्त्व उरले नाही. रत्नाकरकालानंतर मेल सिध्दांताचाही प्रयोग केला जाऊ लागला. षड्जाचा संवादी स्वर म्हणून पंचमाचा प्रयोग होऊ लागला. मध्यमग्राम लुप्त झाला.

षाडव औडव रागांमध्येही लोपस्वरांचा प्रयोग होऊ लागला. हिंडोलात रे–ध ऐवजी रे–प लोप पावले. त्यामुळे रागस्वरूप बदलले आणि श्री रागांतील रे, ग, ध, नि हे स्वर मूळ स्थानापेक्षा एकेक श्रुति चढे लावण्यास सुरूवात झाली. देशी रागांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे त्यांच्या वर्गीकरणाची पध्दतही अस्तित्त्वात आली.

Th 988

---